
डॉ. नितीन मोरे

# रोमिओची 'परी' कथा



# रोमिओची 'परी'कथा

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# रोमिओची 'परी'कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रोमिओची 'परी'कथा

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ११ नोव्हेंबर २०२१ (कार्तिक शु. अष्टमी शके १९४३ )

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बत्तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# रोमिओची 'परी'कथा

## (५ कवितांकिका)

### प्रास्ताविक

शब्दांच्या नादात नादावून
आणि
शब्दखेळांच्या खुणांनी खुळावून
मांडलेला हा कवितांकिकांचा
खेळकर शब्दखेळ!

**डॉ. नितीन मोरे**

# अनुक्रम


१. प्रेमदिवाण्यांचा प्रेमसंवाद

२. मनी मानसी!

३. ती आणि तो.. एक काव्य नाटिका

४. एका कवीची कवितांकिका

५. रोमिओची 'परी'कथा

# प्रेमदिवाण्यांचा प्रेमसंवाद!

(समुद्र किनाऱ्यावर, वाळूत बसलेले दोघे. समोर सागराच्या लाटा, बाजूला वाळूत बनवलेले किल्ले .. दोघे बसलेत.. आडोश्याला. जगापासून लपून..)

तो:

मी चंद्र तू
तू झणी
चंद्राची चांदणी..

ती:

काय सख्या.. हे..
आकाशीची उडति बोलणी
खरे सांगू?
तू पाव
मी त्याच्यावरची चटणी

तो:

तू म्हणशील तसे ..

पण

तुझी न माझी युगायुगाची प्रीती..

ती:

परत युगाच्या कसल्या गप्पा ..

खरे सांगू

तू हीरा अन् मी मोती

तू दिवा अन् मी वाती

तू वीट तर मी माती..

तू गुलाम मी राणीचा पत्ता

तू खल तर मी आहे बत्ता..

तू काडी मी त्यावरील गुल..

तू नदी मी नदीवर पूल

तू टेबल तर मी खुर्ची
तू लाल तिखट मी मिरची

तो:
तू भाकर मी तवा
मी दूध तर तू खवा

ती:
सात जन्म न कोणी तोडी
सख्या असली जमली जोडी

तो:
आठवती या घेतल्या समुद्र तीरी
कसल्या आणाभाका..

ती:
आठवते ते ही अन् आला होता
काठी घेऊनी माझा काका..

पळालास घाबरून
बघून तू त्याची लाठी

तो:
काय करू सखे..
वामांगी तू असता तरणीताठी..

ठाऊक होते काका तुझा
जणू कुण्या गावचा तलाठी
संस्कृतीरक्षक तो लागत असतो
तरण्या पोरांपोरींपाठी

हाती काठी लाठी असता
न लागे चिठ्ठी चपाटी
हुसकून लावित काका सर्वां
लागत प्रेमवीरांच्या पाठी

कुणी न माराव्या कधीच कुठेही
या प्रेमाच्या बाता
कळवळे जीव बुडता
सूर्यासह संस्कृती आता
पण
सोड कुण्या काकाच्या बाता
ही सांज कशी मंतरली

ती:
पण कबूल कर तू राजा..
होती तुझी तेव्हा तंतरली

तो:
त्या मिशाळ काकाहाती लाठी पाहून
अवसान माझे ही गळले ..
धावत सुटलो धरपडत पडलो..
कपडे माझे चुरगळले, मळले..

ती:

काही म्हण पण त्या दिवशी
प्रकरण घरी माझ्या ही कळले

आई म्हणते करण्या भानगड
का कॉलेजा जाते?
प्रश्न गहन जणू पडला घरी
सोडवण्यास आली आते

बाबा काका आते आई
जणू बसली काही समिती
विचारीत मज प्रश्न असे जणू
गुन्हाच आहे करणे प्रीती

मी ही मग म्हटले
तू माझा प्रियकर जिवलग
वाचविली कशी बाबांची
जावई शोधाची दगदग

म्हणती कसे ते पळालास
तू मजला टाकून एकटी
रणछोड कसा म्हणती तुज
वक्र तयांची होय भृकटी

घाबरेल ना कुणी
मी म्हणाले बघता या काका
ओळखून आहे तो काकाला
वाटतो जणू कुणी बोका..

राजा ओळखून आहे तुजला मी
तू न कुणास घाबरतो
पण लाठीधारी बोक्या पुढती
वाघही कसा न बावरतो?

संस्कृतीरक्षणाचा टिळा भाळी तर
आधीच मर्कट त्यातून मद्य प्याला

नंगे से डरता खुद खुदा
अपवाद कसा तू असशील त्याला?

तो:
प्रिया तू माझी समजून घेशी
तू अशी साजिरी साजणी

ती:
तू असता कसली चिंता
बनवेन चकलीची भाजणी

प्रेमाच्या पाडू चकल्या
तळू त्यास खरपूस
प्रेमाने प्रेमाची भरू जत्रा
भरवू प्रेमाचाच उरूस

तो:
छान कल्पना तुझी प्रिये ग
बदलून जगाची कूस

करू मशागत प्रेमाचीच अन्
उगवू प्रेमाचाच ऊस

प्रेमाचीच कढी अन्
भातही बनवू प्रेमाचा
खाऊनी होऊ तृप्त
कण एक पुरे प्रेमाचा

ती:
प्रेम प्रेम प्रेम प्रेम अन्
दुसरे काही न लागे मजला

तो:
खरेच राणी खरे तुझे गं
प्रेमाच्या गाऊ गझला ..
जमवू मैफल प्रेमाचीच अन्
गाऊ गीते प्रेमाची
रॉक डिस्को अन् धिनचॅक
सारी गीते ती प्रेमाची

चोहिकडे दिसे प्रेम प्रेम मज
करू प्रेमाची मासेमारी
चल गं जाऊ सखये असे
आकंठ बुडू प्रेमा-गारी

ती:
सांगू तुला तू असशी कोण ते
तू सागर मी मासोळी
तू प्रेम वाटशी दो हातांनी
मी भरून घेते माझी झोळी

तो:
प्रेम बनविशी प्रेमच शिजविशी
चल प्रेमाचे मासे खाऊ
ती:
क्षण एक पुरे प्रेमाचा
चल प्रेमाच्या गावा जाऊ

प्रेमाचेच पापलेट अन्

बांगडा ही तो प्रेमाचा

झिंगा रावस आणि हलवा

तो ही बनवूया प्रेमाचा..

तो:

हलवा! गोड किती तो

ऐकून सुटते तोंडा पाणी

वाटतेस जणू गुलाबजाम

किती बोलशी गोड तू राणी

तूच ग माझी जिलबी रबडी

नाजूक साजूक प्रिय साजणी

सोडूनी सारे काम न् धाम

बघतच बसावे तुलाच राणी

बघ किल्ला तो वाळूचा

उघडे त्याचे बघ दरवाजे

तुला पाहतो अन् मग

काळजात समथिंग वाजे

ती:

समोर तो अथांग सागर
बघ त्याला येई ती भरती
काय सख्या सांगू तुज मी
अडकले मी त्यातच पुरती

तो:

तू न अडकली मीच गुंतलो
तू कमलपुष्प अन् मी भुंगा
गुलाबसुमना परि ओठांनी
करीशी माझ्या हृदयी दंगा

ती:

चल जाण्याची झाली वेळ
संशय घेतील घरचे सारे

तो:

हुं.. त्यात काय..

सांग शिकत होतीस सागरी
खारे आणि मतलई वारे

ती:
घरचे सारे घेती संशय
देऊनी हाती तुरी मी निसटून येई

तो:
थांब नको जाण्याची घाई
का तुझा तो काका परतच येई?

ती:
नकोस आठवण भलत्या वेळी
काकाचा मामा करूनी आले

तो:
असतो कुणी मी इतिहासातील तर
असते फुटले गवताला भाले

चालून असतो गेलो मी तर
त्या पोलिसी काकाच्या वर
हाय परंतु कसे करू मी
सख्खा काका पडतो तो तर

ती:
कधी संपतील दिवस हे सारे
सुखचित्र माझिया नयनी गमते
सांगू कशी तुज प्रिय सख्या
तुझ्याविन रात्र कशी ना सरते

तो:
नकोस राणी विचार कसला ..
प्रेमाने प्रेमाचे प्रेम-गलबत तरते

दोघे:

प्रेमच कोंदण

प्रेमच जेवण..

चणे प्रेमाचे

खाऊ फुटाणे

प्रेमच खाणे

प्रेमच पिणे

प्रेमच जगणे

प्रेमच तगणे

सरळ पहाणे

असता चकणे

प्रेम

अवघड जागेवरचे दुखणे

प्रेम म्हणजे

जरा न झुकणे

प्रेम ही हुरहूर

पाऊस भुरभूर

प्रेमसागरी पोहत बुडणे

ओठी येई

प्रेमच गाणे

प्रेम तराणे

प्रेम गुणगुणे

प्रेम तुणतुणे

हाय आम्ही तर

प्रेमदिवाणे..

## *मनी मानसी!*

स्थळ: एक होस्टलची खोली.

दोन मित्र. 'तो' अंथरूणात लोळून आहे. हातात उलटे पुस्तक. डोळे स्वप्न पाहिल्यासारखे. बाजूला मित्र बसलेला आहे.

तो:

मी खल ग
तू असशील बत्ता
शोधित फिरतो
वणवण तुझाच पत्ता

मित्र:

घे बोरू हाती
गिरव गिरव तू कित्ता

तो:

(त्याच्याकडे दुर्लक्ष करत)

दिसशील कधी तू

सांग जरा ग राणी

तुजविण असे हे

आयुष्य आणीबाणी

शोधतो तुला मी

रानीवनी पानफुलांत

नजर शोधते तुज

जरी मी मुलीमुलांत

मित्र:

वेड्याची इकडे नसे काही कमी

म्हणतो हा अजूनी.. अजून अंथरूणात मी!

हाय! असे लागले

जिवाला वेड

हा कामातून गेला

सोडत नाही बेड

तो:

होय.. सखये

मज लागले तुझेच वेड!

मित्र:

भेटली न कुणी

तेव्हा ही याची कंडीशन

जणू शोध प्रियेचा

एकच याचे मिशन

तो:

तू करशील मदत तर

देईन तुलाही कमिशन

मित्र:

कमिशन देतो कसले

बाकी किती सबमिशन

असाइनमेंट्स किती बाकी

न काळजी यास त्याची

बस शोधत फिरतो
बाकी न पर्वा कुणाची

कुणी न भेटली तरी
कामातून असा हा गेला
कुणी भेटलीच तर होईल काय
म्हणेल रूमालास अपुल्या शेला?

तो:
तुज माझ्या स्थितीचा
काहीच पत्ता नसे
या नसानसातून
भेटीची आस ती वसे

(चाल बदलून)

ये झडकरी
मी गडकरी

बोलवीतो तुज
सांगण्या गुज

तूच एक कामिनी
तूच ती मन्मनी ..

थकलो ती पाहूनी वाट
ये झणी उडवून थाट

प्रतीक्षेत ही लोटली युगे
उडवीत उडवीत कल्प फुगे..

बघ गगनी उंच उडाया निघे
तेच ते तेच असती कल्पफुगे..

होय .. यस्स.. नक्कीच
बात माझी.. पक्कीच.

का फक्त असावी कल्पसुमे?
बाकीच्यांनी का बसावे उगीच घुमे?

फुगे कल्पनांचे उडवीन मी
कल्पनांची मज काय कमी?

कल्पना पण ती न माझी
खरीखुरी ती माझी रोझी

रोझी .. म्हणजे गुलाब पुष्प ती
नाजूक साजूक मृदु कल्पमती

ये साजणी झणी तू सौदामिनी
तूच माझी भामिनी.. तूच ती कामिनी

(ती हलकेच आत येते.. तिच्याकडे पाहात, उठून बसत)

आलीस उशीरा इतकी तू कां
बनशील का थेट तू चि.सौ.कां.?

ती:

सॉरी राजा सॉरी सोन्या असावी क्षमा
आले मी न बाळगता या क्षुद्र जगाची तमा

ऐकले रे मी मनीचे तुज गुज
आले रे मी भेटी आतुर तुज..

आले झाले कशी मी न ठाऊक तुज
निघाले न इकडे कुजबूज तिकडे कुजबूज

पळाले अशी मी देऊनी हातावरती तुरी
दमले पळले परंतु थकले ना मी पुरी

वाटले कधी नजीक मी असेन माझ्या राजा
गंध मंद मंद पसरला फुलाफुलांचा ताजा

तो:

खरे ग राणी सांगत तू तर
तुही आतुर मी ही आतुर

तू आलीस संध्या बनून का यामिनी
तूच ती जाऊन बसली हृदयातूनी मन्मनी..

आलीस अखेरीस हाय! वाट किती पाहिली
तू नव्हतीस तर होत होती जिवाची ही काहिली

(ती एकाएकी नाहीशी होते)

मित्र:
बघा कसा हा एक उमदा कामातून गेला
भरलेला दिसतसे यास पूर्ण रिकामा पेला..

कोणीही नसता इथे कुणी सुंदरी
मिलनातुर याच्या मनी वसते कुणी कस्तुरी

मनी मानसी दिनरात्र असा एकच एक विचार
एकच काय.. यास दिसतील मैत्रीणी चार..

तो: (तिला शोधत, दचकत)
हे कोण बोले मागुनी माझ्या बरे
ती आलीच शेवटी.. माना न माना कुणी खरे..

प्रिये थांब तू कुणाकडे देऊ नकोच लक्ष
दिसतेस गोजिरी साजरी तू इथे मला समक्ष

मित्र: (प्रेक्षकांकडे पाहून)
चला, चला आपण प्रेमाराधन पाहू
आभासी प्रेम दुनियेत डुंबूनी राहू

तो:
कुणीकडे गेलीस प्रिया.. नको राहूस दूर
कुत्सित जालीम दुनियेच्या येऊ दे डोळा पूर

लपलीस का परत तू माझी राणी
विरहात तुझ्या मी गाईन आर्त विराणी

(ती आत येते)

ती:

मी होते इथेच राजा, गेली न मी सोडून

तो:

वाट पाहतो विरहार्त मी, मान माझी मोडून

अशी नको तू जाऊस दूर गडे सहन न विरह होतो

ती:

सोडून न जाईन सखया तुज, तुजसम दिसतो जो तो

आभास होई मज, होतो मज असला भास

तो:

तव भेटीची लागे मजला निव्वळ आस न आस

मित्र:

चला गड्यांनो सोडू आता एक लांब निश्वास

तो:
लागली आग दोन्ही कडूनी बघ हृदयात

मित्र:
पहा पहा जन हो, वाजले घड्याळात ते सात

आली पहा ती अनामिका अदृश्य स्वप्न सुंदरी
याला दिसते प्रियतमा त्याची, मज न दिसे बंदरी

पण म्हणा काही ही होई मनोरंजन ते खास
प्रियाराधनाचा पाहू चालेल अजून गरबा रास..

तो:
हा कोण बोलतो मध्ये मध्ये, कबाब मधला हड्डी
प्रिये नकोस लाजू, दुनियेशी लढू, मी आहे रेड्डी

हा मध्येच बोलता, तू अशी होशी का नाहीशी
तुझीच स्वप्ने, मी घेऊनी झोपतो उराशी अशी

ती:

कळले मजला तव हृदयीचे गूज

मित्र: (हळूच)

देखो दुनियावालों..

यमक जोडण्या उपयोगी येईल का टरबूज

तो: (दुर्लक्ष करत)

तुझ्या न माझ्या मनात न वेगळे काही अलगूज..

तू नसशी तेव्हा भास होई असल्याचा

तू असशी तरीही का आभास असे नसल्याचा

मित्र:

हे लक्षण काही ठीक नसे ते याचे

जिभेवर याच्या का अशी सरस्वती नाचे..

ती:

तुजविण सख्या मी एकटी होते उदास

भेटलास तू अन मज वाटते काहीतरी खास

मित्र:

याच्यावाचून अडकेल का घशामध्ये घास?

तो:

तू प्रिय मजला प्रियतम अशी तू प्रियतमा

मित्र:

हळूच गड्या.. उगाच बोलून लागेल तुजला दमा..

ती:

तू अन मी.. मी अन तू.. घडेल संगम समसमा..

तू सखा साजणा माझा, माझा प्रियकर तूच

मित्र:

बाहेर पडे राक्षस प्रेमाचा .. उघडून बाटली बूच!

तो:

किती सांगू राणी वाट पाहिली तुझी मी

आलीस सत्वरी म्हणून पाकुळलो मी

मित्र:
अन म्हण, वाट पाहूनी झालो मी कुचकामी

ती:
आले ना आता मी सोडून सारे भवपाश
दोघे आपण, दोघे आपणच भरून राहू अवकाश

हाय तुझ्यास्तव कशी मी होते झुरत
हृदयात धडधड अन् नयनात नीज ना उरत

मित्र:
हे असेच प्रेमसंवाद का म्हणती परत परत?

कुणास ठाऊक स्व अनुभव असला नसे
नाहीच भेटली कुणी लावावी जिने पिसे

तरीही सांगतो कॉमन सेन्सची बात एक
गडबड पहा पुढे .. तसा इरादा माझा नेक

चिकटले प्रेमी जन फार एकमेकांशी
पहा जन हो आता ही गंमत जराशी

प्रिया अशी किती वेळ गोड गोड वागेल
लवकरच गाडी तिची रूळावरून घसरेल

या बावळटास काही न कळणार कधीच
प्रिया ती त्याची फुरंगटून बसेल मधीच..

लागणार कारण तिजला कसले नाही
हा पुसेल नाक आपुले वापरून शर्टाची बाही..

तो:
सखी ती प्रिया तू तूच गं माझी भामिनी
लावण्यखणी रमणी तू तूच माझी कामिनी

वसशी तू कणाकणातून मनामनातूनी
सखी तू, तूच गं तूच अशी गजगामिनी

(ती एकाएकी रागावते.. चेहरा कृद्ध होतो..)

ती: (फणकाऱ्याने)

काय म्हणसी तू? मी नाही बोलत अता

तो:

का? काय जाहली राणी माझी खता?

ती:

नाही नाही बोलणार मी नाही बोलत नाथा

तो:

सॉरी राणी, हृदयवासिनी सांग तरी मज आता

तुजविण सारे उदास वाटे, वाटे असे उदास

ती:

नको उगाचची चापलूसी अन मस्का लावणे बास

कळले मजला आडून कौतुक कसा माझी खेचसी
आले धावून हरणासम मी कारण तूच मला भेटसी

तो:
नाही राणी सखये कळत मज काय असे मी केले
कां तू असशी रागावून ती, काय असे ते झाले?

मित्र:
अंदाज काही का, का रूसली याची राणी
गाईल हा का आता दर्दभरी गाणी

तुम रूठी रहो मैं मनाता रहूं.. येईल म्हणतो मजा
तोंडदेखले म्हणतो केवळ, याला मिळेल असली सजा..

ती:
एक शब्द नको बोलू माझ्याशी. तुला वाटत काहीच नाही
(डोळे पुसते)

मित्र:(हळूच)
हाच तो क्षण जेव्हा पुसेल नाक हा वापरून शर्टाची बाही.

(तो शर्टाला नाक पुसतो.. हवालदिल झाल्यासारखा पाहतो..)

तो:
सांगशील तरी झाले काय.. कोण बोलले काय?
काय जाहले सांग तरी का आली पाण्यावर गाय?

मित्र:
निर्लज्ज पहा विचारतो.. कुणी .. देऊन शेपटावर पाय!

ती:
नाही मी बोलणार नाथा.. कारण विनयहीन वदता

तो:
हाय! असे मी काय बोललो.. आली ही कटुता?

असेल माझी झाली चूक तर मजला क्षमा करी

ती:

व्हॉट्डुयू मीन बाय असेल.. झालीच चूक हे मान्य करी

तो:

ओ के मागतो सरसकट क्षमा या चुकीची माझ्या

सांगशील का चुकले काय या तुझिया राजा?

ती:

चतुर चंचल चपल चरणी हंसिनी मी हरणी

म्हणतोस मला तू मग गजगामिनी हत्तीणी?

या चुकीस नाही क्षमा, परंतु पहिलीच म्हणूनी माफ

मित्र:

प्रेमकथेस न सुरूवात तरीही झाला सुपडा साफ!

तो:

सॉरी सॉरी त्रिवार सॉरी कान पकडतो असा

तूच हरिणी, तू चंचल चरणी तू गुलाब अन मी हा असा

मित्र:

पहा गड्यांनो कसा घाबरे हा आपला भित्रा ससा!

ऐका आता देऊन लक्ष, नवीन करेल हा चूक
मग पहा राहिल कशी याची जीएफ आता मूक..

तो:

जाहली चूक, सॉरी म्हणतो, सोड ते सारे पाठी
आणिक सॉरी, ॲडव्हान्स सॉरी, पुढील चुकांसाठी

ती:

काय? काय म्हणालास सांग परत एकदा

मित्र:

हा बावळट भित्रा, एक काय, करेल चूक शतदा

ती:

एक न पुरे तर, म्हणशी पुढे ही करीन चुका
हाय! न घालवेन मी वेळ माझा तुझ्याच साठी फुका

मी निघते आता युझलेस असा तू असशी

तो:

चूक जाहली, माफी असावी .. सांगतो कासाविशी

मित्र:

अशा चुकीला नसते माफी, होईल ही अंतर्धान

बघतच राहिल हा हात चोळीत, दिसेल कसे ते ध्यान

(ती नाहीशी होते)

तो:

गेली उडूनी परत ती अस्मानीची परी

मित्र:

हात जोडतो.. विसर तिला मित्रा तू लवकरी

तो:

काय ती कशी गेली का रे उडूनी

प्रियतमा ती माझी रे नंदिनी?

मित्र:
नंदिनी? ती राजवाड्यांची नंदिनी?
करू पाहतोस तिला तू तुझी बंदिनी?

तो:
असेल किंवा नसेल, नंदिनी माझी रे फॅंटसी
असा कसा तू पाय घालतो.. ती माझी रे प्रेयसी

मित्र:
वेडा का तू.. ती नंदिनी आहे आधीच बुक
उगाच करीशी कशास वेड्या खयाली पुलाव कुक

तो:
वेड लावूनी गेली ती तर उडतो मी पिसांपरी
का पंक्चरवसी विमान माझे जे उडते अधांतरी?

मित्र:
उडे विचारी विमान तुझे ते उगाच ते अंबरी
ती गेली म्हणण्या, आलीच होती ती कुठे तरी?

दिवास्वप्ने पाहणे ठीकसे, पण उतरा जमिनीवर
ठेपली जवळ एक्झाम आता, जोडितो तुजला कर

हद्द जाहली स्वप्नांची ती, कशास नसता हट्ट

तो:
म्हणतोस असे तू.. तर ऐकावेच लागेल मला वट्ट

मित्र:
दुरून डोंगर आपल्या साठी धर बोट माझे घट्ट

नसती आपल्यासाठी नंदिनी मंदिरा सुषमा आदी
उठ चल सुरू कर काम आपुले, सोडून आपली गादी

तो:
म्हणतोस असे तू.. तर असणार खरेच ते असे
उतरतो आता जमिनीवरती सत्य जाणूनि मी ते तसे..

अजूनी परंतु धुंदीत मी, तिजसवे गेल्या घटिका चार
वाटते ती आलीच होती, तुज न ठाऊक काही फार

मित्र:

ती ही कल्पना, धुंदी कल्पना कल्पनाच सगळे सार
कल्पांतातही ती नाही तुझी हे समजून घे तू यार..

तो:

सत्य जाणूनि संपवतो मी हा मनचा खेळ ..
उदास आपुल्या आयुष्यात पण गेला ना सुंदर वेळ

आपुल्या साठी अशा कल्पना मनी मानसी वसती

मित्र:

झटकून टाक, कामा लाग, कल्पनाच शेरभर असती!

## ती आणि तो.. ऑफ द रेकॉर्ड!

(एक स्टेज..

पाठी सिनेमाचे पोस्टर.

'प्यार का संदेश.. beauty of love & story'

त्यावर स्टेजवरच्या नायक नायिकेचे फोटो..

मध्ये एक लाल गुलाबाचे फूल.

जवां दिलोंकी कहानी.. असे खाली लिहिलेले.

आजूबाजूला सजावट. हृदयाच्या आकाराचे फुगे बिगे.. त्या सिनेमाचे प्रमोशन असावे असा माहोल आहे. स्टेजवर सूत्रधार, श्री. महादेव महाकाल. मागे नायक विनयकुमार नि नायिका कोमलांगी स्तब्ध उभे..)

सूत्रधार:

नमस्कार मंडळी

आदाब सतश्री अकाल

स्वागत तुमचे सर्वांचे

करतो नमुनी श्री.महाकाल

हिरो हिरवीण हजर ही येथे
वेळेआधी खरे
प्रथमच सिनेमा दोघांचा हा
म्हणूनच असती बरे

कान देऊनी ऐका सांगतो
कुणी ऐकण्या आधी
प्रेमकथा ही अशी बघा
गोष्टच आहे ही साधी

पण सांगायाची गंमत
काही अलगच आहे
आली हिरवीण इथे हिरोला
अलगच नजरेने पाहे

हीरो म्हणे हीच का ती
जिच्या पाठी मी फिरलो
असेन ही.. करणार काय
हीरो मी.. माझा नुरलो

स्टोरी लाइन म्हणते
ही आवडलीच पाहिजे मला
एरवी अशी ही की कधी न
मी ढुंकून पाहिन तिला

हिरवीणचा ही विचार अलग न
हा मथ्थड माझा हीरो?
स्टाइल नुसती जणू मवाली
हा हीरो कसला झीरो!

गोष्टीत मी जीवही देते
बथ्थड तोंड्यासाठी ह्या
करू काय हा गोंडा घोळतो
गोष्टीची डिमांड म्हणे त्या!

ऐकलेत ना हे सांगणे
आता जा विसरून
ऑफिशियली होईल सुरू
प्रोग्राम नंतर जा समजून

प्यार का संदेश लव्हस्टोरी
एक सिनेमाचे हे प्रमोशन
काय नाही विचारा यात
ॲक्शन सस्पेन्स इमोशन

त्या आधी ऐकून घ्या
हीरो हिरवीणीची गडबड
रियल लाईफ दोन्ही बोलती
ऑफ द रेकॉर्ड ही बडबड

काव्यमय झगडा त्यांचा
जुगलबंदी ही जणू
तो म्हणे कोमलांगीस थोराड
ही म्हणते याला गणू!

(महाकाल बाजूला उभा राहून ऐकू लागतो.
आतापर्यंत स्टेजवर फ्रीझ होऊन उभे दोघे नायक
आणि नायिका जिवंत होऊन बोलू लागतात.)

तो:

उदईक जाऊन खाऊ घालून
करीन म्हणतो तव संतुष्ट मनी
उच्च कशी भ्रू लेखिशी कस्पट
समजसी स्वतः तू अशी रमणी
काय करावे काही ना कळे
असशी अशी तू जूनतरूणी

ती:

ऐक जरा तू न मारी गमजा
तोंड पाहा ते दर्पणा मधी
पीठ फासूनी होशी गोरा
खऱ्याखुऱ्याची सर येईल कधी

लावी साबण खसा खसा तो
दिसण्या साफ जरी मलीन मनी
फास हवी तर हवी तितकी
टाल्कम पावडर भरूनी बॅग गनी

तो:

काय फुशारकी रंगाची मारीशी
कोकीळ असतो कृष्ण किती
रव तयाचा किती मधुर
रंगाची त्या नसे क्षिती

ती:

अहा! अहा! हा! स्वतःस समजशी
कर्कश असूनी कोकीळ कंठी
वक्र तयाचे नाक दिसतसे
बाक दिसतसे पाठीवरती

काय ध्यान ते  बोबड कांदा
असून अडचण नसून वांदा
कट्ट्यावरी शिट्ट्या फुंके
हाच तुझा का असतो धंदा?

तो:

दिसण्यावरती जाऊ नको तू
गुण बघ माझे गहन किती
स्वतःस समजशी अतिशहाणी
करू तुला मी सहन किती

ती:

नकोस करू तू सहन मला ते
पाठ सोड तू माझी अशी
तुझ्या सारखे छप्पन असती
मोजून दमले मी ही अशी

तो:

काय दिव्य तू प्रकट जाहली
जणू इथे अवनी वरती
तुझिया मागे किती ते असती
ठेवून अक्कल गहाण किती

ती:

काढू नको तू उणे दुणे ते
तुज न ठाऊक माझी महती
गुणवर्णना पडे कमी तो
जिथे तिथे माझी चलती

तो:

अहा! अहा! हा! समजे जशी ती
स्वतःस तेजोमय पणती
क्षीण असे ती मिणमिणती अन
प्रखर दिवा समजे पण ती

ती:

असे असूनही कशास करीशी
मग पटवाया मखलाशी
शोध कुणी ती दुसरी कन्या
चारा घालील तुला अशी

तो:

चारा चरण्या वृषभ नव्हे मी
काय तुला ठाऊक नसे?
मुश्किल किंवा असे नसे ते
जे जमते ते कसे बसे

कट्ट्यावरती बसती कन्यका
घेण्या एकतरी कटाक्षी
असा तसा नसे मी ही
समजून घे तू मीनाक्षी

ती:

नावच माझे नसे मीनाक्षी
गुणवर्णनाने ही मीही अशी
गोड गोड ते बोल ऐकूनी
समजू नको मी पडीन फशी

ठाऊक मजसी कर्तूत तुझी ती
तू जणू गायीवर गोमाशी

गोमाशी गोचीड जणू तू
चिकटून बसशी पदराशी

ऐक इथे जो जो आला
तू पटवायाला येशी असला
नाद घेशी तू कसला माझा
नेहमीच जो तो फसला

तो:
कुणास येथे पडले आहे
पटवायाचे नडले आहे
सांग मजसम राजबिंड्या
कुठे कसे ते कमी आहे

मागून माझ्या लागती रांगा
एक हीरो मी टाकीत टांगा
एक सांगतो भले तुझे ते
घेऊ नको तू माझा पंगा

ती:

ठाऊक मजला रांगा कसल्या

घेऊन चपला मारत टपल्या

कळे लायकी तुझी ती मजला

मार खावया असला सुजला

नको करू रे अट्टहास

मागे पडणे आता बास

तू असशी बुजगावणे अन

मी असते खासम खास

(दोघे पाठी फ्रीझ होतात.. प्रकाश सूत्रधारावर पडतो)

महाकाल:

या भांडणास नाही अंत..

दोघांनाही नाही खंत..

अशाच करतील उखपाखाळ्या

किती जाओ काळ अनंत

सिनेमामध्ये गोष्टी गुलुगुलू
जणू बने एक दूजे के लिए
प्रत्यक्षात बघा म्हणती ते
हम मिले तो मिले किसके लिए

प्रत्यक्षातली ही असली
पडद्यामागे राहिल गंमत
ऑन स्क्रीन केमिस्ट्रीची
बाहेर चर्चा राहिल रंगत

पेटली ट्यूब हीरोची अचानक
हीरो अचानक झाला जागा
म्हणेल हिरवीणीला बये ग,
कशास करतो आपण त्रागा?

(विनयकुमार आणि कोमलांगी परत जिवंत होतात)

तो:
ऐक सखे थांबीव खरे
ते भांडण न करणेच बरे

तुजही ठाऊक मजही ठाऊकी
तुझी न माझी मजबुरी ती
स्टोरी लाईन अशीच असता
इथे अशाच गोष्टी घडती

तू हीरॉईन मी हीरो असता
पाठी लागण्या उपाय नसता ..

ती:
दुसरा काहीच नसता रस्ता
भांडायाला का खाव्या खस्ता?

तू न मी दोघे मिळूनी
बस चित्रपटातील कठपुतळी

तो:

म्हणू एक दुसऱ्यांस सोन्यासारखे
ठाऊक असू जरी पितळी

ती:

बस कर बस सारे कळले
म्हणणे तुझे मज आकळले
समजले रे मी समजून गेले
तुझे सांगणे ही मजला पटले

तो:

असता गोष्ट अशीच येथे
दिसशी तू मज चंद्रमुखी
दुरून साजरी चंद्रावाणी
जवळून भले तू दुर-मुखी

आवडणे कम्पलसरी ते
चॉईस मजला तो काही नसे

नकटी असशी वा ठेंगणठुसकी
अप्सराच तू मज भासे

ती:
ठाऊक मजला गोष्ट ती सारी
भल्याभल्यांना ही भारी
रंजक बनवा गोष्ट अशी ही
करून कशीही तय्यारी

राजकुमारच दिसशी मज तू
ऑर्डर येथे वरून असे
गोष्टीमधला शूरवीर तो
कसा ही असता तसा दिसे

ठाऊक मजला कागाळ्या तव
ठाऊक तुझा कांगावा
नकटा परी तू राजबिंडा
हा डायरेक्टरचा सांगावा

(पाठीमागे दोघेही स्तब्ध उभे. सूत्रधार येऊन उभा राहतो)

श्री.महाकाल

आनंद आहे..
आनंदी आनंदच आहे!
लवकरच प्रकाश डोक्यात
पडलेला आहे!

न पडून प्रकाश
कोठे जातील?
प्रोमोचा करार मोडतील
तर काय खातील?

एकमेकांशी कशी जमली
केमिस्ट्री ते मानावेच लागेल
काम करताना किती केलं
एन्जा◌ॅय ते सांगावेच लागेल

त्याआधी.. त्याआधी सारे सोडून
एक जाॅइंट स्टेटमेंट ही द्यावे म्हणतात
उगाच आपले ऑफ द रेकॉर्ड
जस्टिफिकेशन देऊ म्हणतात!

(पाठून दोघे हलायला लागतात. बॉडी लँग्वेज जरा मैत्रीची..)

ती आणि तो:
नाचविती आम्हा लेखक बिखक
चॉइस आम्हा काही नसे
त्या चष्म्यातूनीव पहावे
म्हणजे जग हे सुंदर भासे..

भासमान हा भास असे तो
उत्तर त्याला दुजे नसे
रंगमंच तो असाच असतो
पर्याय तयाला काही नसे

दोघे आम्ही कळसूत्री ते
कठपुतळी जणू असू
तोंड देखले पडू या प्रेमा
नंतर दोघे रूसून बसू

(दोघे हातात हात घालून प्रोमोच्या प्रोग्रामच्या खुर्च्यांवर बसायला जातात. पाठून गर्दी आत शिरते. प्रोग्राम सुरू व्हायची तयारी नि लगबग दिसायला लागते..)

श्री. महाकाल:

मायबाप प्रेक्षक हो
हे सारे काही नव्हते खरे
ऑफ द रेकॉर्ड होते ते
मनावर न घ्यावे बरे

माना तुम्ही सत्य ते तेच
पडद्यावरती जे दिसते

उगाच ऐकून या गप्पा
म्हणाल.. हे खुपते अन ते खुपते

सुरू होईल प्रोमो आता
सांगतील कसे मेड फॉर इच अदर
हेच सत्य अन् हेच खरे ना जरी
असतील हे मॅड ॲट इच अदर!

# एका कवीची संगीतिका

एक टेबल खुर्ची. वर टेबल लँप. कवी म्हणावा असा तो कवी मार्कंडेय बसून लिहायचा प्रयत्न करतोय. बाजूला कागदांचे बोळे पडलेयत. खोलीत अस्ताव्यस्त पसारा. बाजूच्या खोलीत कवी पत्नी झोपलेली दिसतेय. वेळ सकाळची. कवी.. मार्कंडेय ऊर्फ मॅनमोहन झोपेतून उठल्यासारखा.

तो :

पाहिले तुला मी स्वप्नामध्येच काल
काय रूबाब तो हाय गोबरे गाल

गेलीस करूनी तू मजला एका क्षणात विद्ध
मी हसलो .. तू हसलीस.. मी झालो हतबुद्ध

नाहीच हरण्या शिकलो मी कधी माझी हिम्मत
जे हवे मिळवावे मोजून पडेल जी किम्मत

बघताच तुला असा की जाहलो घायाळ
चापूनचोपून बसविली माझीच मी आयाळ

फोटोतही दिसली काय तुझी अदा ती
करून गेली क्षणात असली मला फिदा ती

पण होशील माझी कशी मी तर असा हैराण
नसशील तू तर जग भासेल मला वैराण

क्षणक्षण आता मी विचार तुझाच ग करतो
सांगतो तुला मी कणकण सखये झुरतो

असेन कवी मी करीत बसतो अशा कविता
बघताच तुला रवीची झाकोळे कशी ती सविता

हाय कुठे तू, ठाऊक न कोण तू असशी
देऊन असा दर्द कशी तू लपून बसशी

(त्याच्या खुर्चीपाठून)

ती:

थांब थांब न असा कसा तू फसशी
कल्पना वारूस असा कसा पळविशी

मी नाहीच सत्य अन् असेन तुझी कल्पना
उगा न करीशी मिळविण्या तू ही वल्गना

मी आहेच आभासी समजून घेशी तू
सखी न तुझी मी हेही उमजूनी घेना तू

वाटेत तुझ्या वाटे दिसले तुजला फूल
दिसले सुंदर मग लगेच पडली भूल?

कोण कशी ती दिसली तुजला मी नार
पण नाही सत्य मी थोडातरी करशी विचार

धावतो गड्या तू काय आभासा मागे
घेऊन रंगवण्या कपड्यांचे तागे तागे

अशक्य! शक्य नव्हे ते तुज न ये लक्षात

तो:

अशक्य .. नाहीच शब्द हा मम कोशात

ती:

का उगाच करशी वादावादी फार
बदल कोश तो, शब्दांचा उगा भडिमार

तो:

का करशी असली निराश मजला राणी
अंगात माझिया धमक असली, काढीन पाणी

ती:

राणी? मी नव्हते कधीही तुझी रे राणी
उमटे मुखातून तुझिया अखंड काव्यविराणी

अखंड फुलती काव्यपुष्प ती, तू जणू फुलदाणी
समजतोस राजा स्वतःस, तू तर कवितेचा वाणी

गातोस कशाला उगाच असली गाणी
गाणी नव्हेच ती, होतील हाय विराणी

तो:

हाय! बोलतेस तोडून तू माझी ग प्रतिभा

सत्य नसे का सांग, दिनकराची आभा

(दरवाजावरची घंटा वाजते. ती नाहीशी होते..)

कवीपत्नी :

आला बघ तो दूध देण्यास दूधवाला गवळी

तो :

हाय! गवळी कुठे अन् घेऊ बघतो तिला मी जवळी

पत्नी :

घे उठून आता दूध लीटर मुकाट एक

तो:

घेतो घेतो.. पाळतो हुकूम तुझा प्रत्येक

न पाळून सांगेन कुणा मी सांग..

(दूधवाला परत घंटी वाजवतो)

पत्नी :
नको उगाच वटवट देई दूधवाला ही बांग..

(तो उठून भांडे घेऊन जातो. दार उघडतो..)

दूधवाला :
का साहब करत हो इतनी काहे देरी
हम हूं जावत आज मुलुक, करना है तय्यारी

लो कर लो बरतन सामने डालत हूं दूध लीटर एक

(दूध घालतो नि जातो)

तो : (दुधाकडे पाहात)
दूध कम ज्यादा पानी, भय्या काहे न है तू नेक?

चल आली वाटते कविता मनात माझ्या एक
ती सुंदर कितीतरी वा! सुरेख कल्पना दिलफेक

जुळवून अक्षर अक्षर, अक्षर काव्य प्रसवेन
का भावभावना माझ्या मी लपवेन?

बस हवीच साथ, प्रभा प्रतिभेची आता मजला

पत्नी :
सकाळी नकोच कटकट, दुमदुमवू नकोच मजला.

कालच आलेली पुसायाला वरची ती जोशीण
कोण बरे विव्हळतो सकाळी ..

तो :
.. जोशीण नव्हे ती डाखीण

कुत्सित त्या कोणा बोलांची नसेच मज ती तमा

पत्नी :
काय चूक बिचारीची.. तिचा उफाळे सकाळी दमा..

सोड कविता आता, तू तर कर लवकर तू चहा

तो :

हाय!

यःकश्चित चहा कुठे, कुठे ती कविकल्पना अहा हा!

शब्द शब्दांनी बघ तो माझा कविता सागर सजला

पत्नी :

काय म्हणाला.. बोल परत तू.. ऐकू दे मजला

यःकश्चित की आणि काही बोल सकाळचा चहा

तो:

छे!छे! नाही कुठे काय ग? प्रिये पहा हा चहा..

(तो किचन कडे पळतो..)

***

(मार्कंडेय ऊर्फ मॅकमोहन ऑफिसात पोहोचतो.)

हेडक्लार्क :

मॅकमोहना किती उशीर हा किती वाजले पहा

मॅक :

सॉरी, सॉरी, सर, सर, मी बनवत होतो घरी चहा

हेडक्लार्क :

किती सबबी सांगत असता कशा कल्पना सुचती?

मॅक :

कवीच मी असता, कल्पनांची नकोच गणती ..

पण ऐका ना सर उशीर झाला याचे हे कारण
चहा न बनविला तर भार्या करिते घराचे रण

येतो क्षीर देण्याकरिता भय्या उशिराने कसा
कूर्मगती ने हालत डोलत दूध घालतो असा

कषायपेयावाचून उघडे नच नेत्र ती जाया
डबा घेतल्यावाचून न निघतो पडतो तिच्या पाया

या सर्वांसी विलंब होई, करिता कितीही घाई
सात बावीस त्यातच टाटा करूनी निघून जाई

मग स्टेशन येता ट्रेनही बसते अडून जणू व्याही
काय करावे सांगा तुम्हीच सर, बिल्कुल समजत नाही.

हेडक्लार्क :
मॅक नका मारू थापा, लंब्याचवड्या बाता
कचेरीच ही बंद करून का बसावयाचे आता?

एक कोंबडा देतो तुमच्या घरी पाठवून
रोज सकाळी देईल बांग अन् देईल तुम्हा उठवून

मॅक :
उठण्याचा नसे प्रश्न सर, रात्रभर डोळे उघडून मी पडून
खरेतर प्रतिभेपाठी लागलोय मी झोपच गेलीय उडून

प्रतिभा परंतु न येता ये जवळी
वाट पाहातो तो तर येतो गवळी

त्यास होतसे उशीर अन् उठते न ती वामांगी

हेडक्लार्क :
बस्स झाली मॅक, तुमची पुराणातील वांगी

दूधवाल्यास लेट होतसे उपाय करू मी काय?
की पाठवून देऊ घरी डायरेक्ट ती गाय?

बांधून ठेवा बाल्कनीत ती, घाला चारा दिनभर
काढा दूध सकाळसकाळी अन निघा घरून भरभर

म्हणजे तरी याल ना कचेरीत वेळेवरी?

मॅक :
काय सर चेष्टा गरिबाची करता तुम्ही तरी

हेडक्लार्क :

लेट मार्क ते लाल लाल लागले मस्टरवरी

मॅक :

सॉरी सर, सॉरी सर यापुढे येईन वेळेवरी

तो पांचाळ येतो उशीरा अन् सबबींचा वाजवी बाजा
रोज मारतो कुणी शेजारी अन् आजी किंवा आजा

प्रामाणिक मी सत्य सांगतो तर ते कुणास न पटते

हेडक्लार्क :

राहू द्या रेड मार्क्स तर .. घेतो झाले मी पडते

घ्या ती कालची फाईल हाती संपवा हिशेब पूर्ण
डोंगर कामाचा .. पाडा फडशा करून चूर्ण

उद्या जायचे हेड ऑफिसी घेऊन फाइल्स सगळ्या

मॅक :

डोन्ट वरी,अॅम हिअर, करीन साऱ्या हातावेगळ्या

फाईल्सच तर असती.. मोड आकडे..
न शब्द कवितेचे, पाय ओढती जणू खेकडे

करतो सोपी खर्डेघाशी
त्यास न लागे प्रतिभा ही जराशी

हिशेब असले करतो चोख
सर असो चेक्स वा असो ती रोख

कामामाजि मी सदैव तत्पर
संध्याकाळी फाईल्स घ्या सर

करतो सारे चुटकीसरशी
मग उभा भले हो बॉस पारशी

बोमन बाटलीबॉय बॉस आपला
येता जाता जणू तवा तापला

पण मार्क्स लाल हे काही हटवा

पगार होईल कट, प्लीज वाचवा..

हेडक्लार्क :

मॅक मोहना

शब्द दिलेला पाळला कधी ना

मॅक :

सर या वेळी होईल ना चूक

हेडक्लार्क :

बघून घेईन, राहिन न मी मूक

न झाले तर वा चूक जाहली

कापेन पगारी पावली न चवली

मॅक :

नका सर विचार आणू मनात असले

कमी पगारी मग भागे कसले

खर्च भागता नऊ नाकी येती
घेणेकरी मग डोके खाती

बिले कशाकशाची कशी भरू सर

हेडक्लार्क :
नको रडगाणे, लागा कामाला तर
***
(मार्कंडेय आपल्या घरी आला आहे. त्याची पत्नी फोनवर बोलतेय.. तो उभा राहून ऐकतोय..)

पत्नी :
कशी ग आहेस.. कुठे ग आहेस?
गुड न्यूज? नाही? कधी देणारेस?

लग्न तुझे ते नवेनवेले ठेव बरे त्यास मुठीत
बोल तयाला काय बोलशील? येतो जेव्हा घरी सुटीत

मुठीत ठेव ग झाकून ती असते सव्वा लाखाची
बाकी काय? अक्कल नाही गं.. ती बिन कामाची

काय सांगू सखे तुज कशी कथा ती
कविपत्नीची ग कसली व्यथा ती

मध्येच तसा तो बराच असतो
कविता न सुचता खराच रूसतो

शब्द शब्द तो जोड जोडतो
तारे अकलेचे फार तोडतो

बरेच बाई बरे तुझे ते असते
नवऱ्यास तुझ्या हे वेडच नसते

जुळवून शब्द का पोट ते भरे ते

(त्याच्याकडे पाहात ..)

नंतर बोलते ग.. आलेच घरी ते..

(पगाराचे पाकिट पत्नीच्या हाती देत..)

मॅक :
ऐक सखये गुड न्यूज माझी
गोड बातमी ताजी ताजी

तारीख एक ती आली पहा ती
प्रिये घे हे तुज, पाकिट हाती

पत्नी :
एक तारीख आज छान ती
पगार येई आपल्या हाती

महिन्या अंती पगार मिळतो
कसा घरी तो कुणा न पुरतो

पण आज न गावे रडगाणे
हाती नोटा.. धुंद तराणे..

(पगार हातात घेऊन मोजू लागते.)

पत्नी :

असा कसा हो अनर्थ झाला

पगार हाती का कमीच आला?

या महिन्यात खर्च अनंत

पाहू कसा महिन्याचा अंत

पगार सांग तू कुणी कापला

की येताना तूच उडवला

पोरांचे फी पुस्तक दप्तर कपडे

तो :

होईल गं.. करू काहीतरी बापडे

कचेरीत जाता उशीरा रोज जर

पगार कापण्या तयार सत्वर

पत्नी :

कारण सबबी देता कसल्या

कचेरीत कामे का करता असल्या

ते नाही काही करेन उपाय मी काही

इतुक्या दमड्यांत मुळी भागत नाही ..

बघते बघते काहीतरी करते..

तो :

बघ पगार हाती.. काही तुज स्मरते?

म्हणालीस पगार दिवशी तू

काही करशी गोडधोड तू

पत्नी :

गोड धोड ते विसरा सारे

उघड तोंड अन् खा वारे

फक्त करत बस कविता उगाच तू
भरेल पोट त्याने का सांग तू

काय बघून प्रेमात तव पडले
नव्हे नव्हे नशीबच फुटले

पश्चात्ताप होतो अन् मजला
काय बघून संसार सजवला

(पत्नी तणतणत आत निघून जाते..
'ती' येऊन खुर्चीमागे उभी राहते)

तो :
तुम्हा सांगतो.. हिने काय पाहिले
मी कवितेपायी आयुष्य वाहिले

मॅक किती कवी तू थोर..
थोर शब्दावर देऊनी जोर

त्या शब्दांवर होतीस भाळली
कविता पुष्पे तू जणू माळली

प्रतिभे माझ्या हे काय जाहले
या कानांनी हे काय ऐकले..

गेलीस कुठे गं तू नाहीशी होशी
ये लवकर अथवा येती जोशी

ती :
कवी असशील पण धोंडा असशी
भार्येचा राग जरा न समजशी

तो :
प्रतिभे फितुर जाहलीस तू ही
काळजी माझी तुला न जरा ही..

(डोक्याला हात लावून बसून राहतो. समोर कवितांचे बाड आहे. समोरच्या कपाटातून कवितांची हस्तलिखिते

काढून टेबलावर रचू लागतो. सगळे बाड रचून झाले की समाधानाने त्याकडे बघत राहतो ..)

तो :

अशावेळी समाधान तुमच्यामुळेच पहा
काव्य माझे किती प्रसवले मी पहा अहाहा!

कविच्या आयुष्याची हीच कमाई
का न मारेन मी कवितांचीच बढाई ..

कुणी म्हणा काही.. श्रीमंत मी मीच तो कविराज
काव्यांगणी अन् काव्यावकाशी मीच राजाधिराज

***

(बेडरूममध्ये. तो झोपलाय. पत्नी येते आत.. त्याला उठवते..)

पत्नी :

उठ उठ तू किती गुणी तू किती चिंता तुजला
किती घेशी काळजी आमची अभिमान रे मजला

महिन्याकाठी किती कमी यावा तो पगार
खर्च आपले दुप्पट तिप्पट व्हावे वाटे पसार

धन्यवाद तुज खुल्या दिलाने दिलीस रद्दी तू काढून
विचार होते करत मी, काय पुढे ठेवले असे वाढून

पण आहे तुजला चिंता इतकी हरखून मी गेले
ती कवितांची चळत अन् रद्दी मी विकुनिया आले

या पैशांनी भागेल महिना आता चिंता नको..

(तो एकाएकी उठून उभा राहतो. मग धावत आपल्या टेबलासमोर उभा. रिकामे टेबल पाहत डोक्यावर हात मारून घेत..)

तो :
विकशी माझ्या साऱ्या कविता..अशी कशी तू बायको?

# रोमिओची 'परी'कथा

आई, बाबा नि परी. एक मध्यमवर्गीय कुटुंब. त्यांचे घर. परी, विशितली तरूणी. आई पन्नाशीत तर बाबा साधारण त्याच वयातील, पोट सुटलेले ..

आई:
काय ऐकते ऐकता न तुम्ही ही
लक्ष कुठे हो असते तुमचे
दिसते सोम्या बरोबर ही आता
गोम्यालाही भान ते कुठचे

बाबा:
शिव शिव शिव काय ऐकतो
कधी झाली मोठी अपुली छकुली?

आई:
समजा अजूनी बाळ तिज अन्
लाड करा तिचे जणू कुक्कुली

शिवले तोंड का या छकुलीचे
गधडे का गं बोलत नाही
दे उत्तर आता झरकन् न
निर्लज्जासम पाहत राही

बाबा:
अगं देशील बोलू तू तिजला आता
पोर माझी ही तशी नाही
राजकुमारांची ही लाईन
मी उघड्या डोळ्यांनी पाही

आई:
खरेय तुमचे शंभर टक्के
हुं! राजकुमार ते उघड्यावर पडले
पाहून काल तिज त्या कट्ट्यावर
ढसा ढसा मी ही रडले

बाबा:
शिव शिव हे काय ऐकतो
बबडी माझी अशी कशी वागली

आई:
बसा नुसते करीत शिव शिव
सांगून थकली मी उपडी बादली

सांगत होते कितीदा मी ही
तोड तोडून आपला जीव
पण नाही .. आपलेच खरे म्हणा
करू किती तुमची मी कीव

कोण कुठला रोड रोमियो
पळवून आपल्या बाळीला नेतो

बाबा:
बघतोच कसा येऊदे पुढे त्यास तर
आपुल्या बाळीस उचलून घेतो

हिंमत आहे मनगटात अजूनी
हाडपेर पुलपुलीत नाही
दिसत भले असे असा ही
हा देह खरा थुलथुलीत नाही

अजूनी आठवे तालीम मजला
स्नायू स्नायू हा मजबूत आहे
फोडेन कुणाचे थोबाड एकदा
अशी अजून करतूत आहे..

परी:
लोगों .. न मारो उसे
वो तो मेरा दिलदार है
हाय जमाना जालिम इतना
प्रेमाबाबत अनुदार है

आई:
प्रेम? प्रेम?? तुला गं ठाऊक?
कसले ते खातात कशाशी
प्रेम म्हणे हे नादान मुली
कवटाळून बसशी तेच उराशी

झाली असली बेरफण तू
दिली उगाच तुजला सूट

बाबा:
आण पुढे त्या सख्या हरीला
हाणेन थोबाडी त्याच्या बूट

गुंड पुंड अन् असा मवाली
त्यास करतो असा सरळ

परी:
काय हो बाबा असेच म्हणता
त्याच्याबद्दल कसले हे गरळ

किती किती तो आहे चांगला
त्याची अड्ड्यावरती किती ती वट

आई:
चूप बस कार्टे तोडशी तारे
तो खट असेल तर मी दीडपट

अस्ताव्यस्त केस कसे ते
काय रूप ते अहाहा सुंदर

नाहीच भेटला तुला कुणी का
झाडावरचा जणू हा बंदर

परी:
बघा नजरेने माझ्या त्याला
दिसेल मग तो तुम्हास सुंदर
उगाच म्हणता त्यास तुम्ही
असा कसा मज गमतो बंदर

गळ्यात बांधून रूमाल फिरतो
कुणी म्हणू नका त्यास मवाली
हृदय हळूच चोरले माझे त्याने
गात गात तो जणू कव्वाली

आई:
बाई बाई गेली हाताबाहेर पोर
फारच फुटली तुला ग शिंगं
कोण कुठला सडक छाप
बघूनच घेईन त्याला घेऊन भिंगं

परी:
सडक छाप का म्हणता त्याला
दिलवर माझा तोच असे
नाही घ्यायची ऐकून काही
किलवर एक्का तोच असे

कसा खेळतो रमी अन् पत्ते
उतारी करणारा तोच असे
म्हणती त्यास सख्या हरी का
मजला असली बोच असे

भल्याभल्यांना घाम फोडितो
शिवराळ भले त्याची वाचा
पत्त्यांचा हा डाव मांडिला
तो माझा एक्का हुकुमाचा

आई:
अड्ड्यावर पडिक सदा तो
पुतळा दिसतो सर्वगुणी
कशी बघतो तुझी तो स्वप्ने
तू तर असशी लावण्यखणी

काम न धाम न आहे धंदा
फिरतो करत मवालीगिरी

परी:
नका नका ना बोलू असले
त्यामुळेच जीवन नय्या पैलतीरी

बघाल तेव्हा पटेल तुम्हा
कसा आहे तो डॅशिंग

आई:
बोलू नकोस उगाच काही
बांधून बसला गुडघ्या बाशिंग

कशी अशी ग फसली माझी
लाडकी कार्टी परीराणी
हलवा हातपाय तुम्ही तरी
आहे अगदी अणीबाणी

सांगितले होते तुम्हास मी तर
मोकळीक इतकी देऊ नका

बाबा:
कळले बाई, तुलाच सारे
बोल न लावीशी मला फुका

परीराणी सांग मला तो
भेटेल कुठे गं सांग मला
फसली पोर माझी गुणी ती
मिळून सगळे सोडवू तिला

परी:
ऐकून असता त्याच्याबद्दल जर
काय म्हणता.. बदनाम असे तो
नकाच ठेवू विश्वास असाच
पाहूनीच ठरवा कसा असे तो

होय हो, बाबा भेटा त्याला
अवतारावर बाह्य जाऊ नका

फणसासारखा आतून गोड तो
त्या काट्यांवरती जाऊ नका

बाबा:
भेटतोच त्याला एकदा असा मी
अड्डा त्याचा असे कुठे
आहे काही न घरदार त्याला
की पालकही त्याचे आडमुठे

परी:
काय करायचे घरच्यांचे त्याच्या
जन्म त्यासंगच काढीन मी
जोडी जमली माझी त्याची
जशी लागली हँड रमी

भेटेल कुठे नक्कीच तो सांगू
जाता येता शीळ मारतो
चौरस्त्यावर अड्डा त्याचा
तो पडिक नाक्यावर असतो

उगा भेटीचे नाही नखरे
सगळ्यांना तो असा भेटतो
नाक्यावरती गँग घेऊनी
बिंधास शिट्या अशा फुंकतो

आई:
काय बोलते काय चालते
लाज सोडली का तू बरे
ढकलून देईन विहिरीत तुला
त्याहून आहे हेच खरे

काय की इज्जत राहिल
बाबांचा विचार करशील का
थांब करावे लागेल काहीतर
देऊ त्यास कुठला दणका

परी:
बघण्या तयार नाहीत तुम्ही
दृष्टि तुमची कशी झापडबंद
आला हल्लीच सुटून चौकीतून
माझा हीरो असला तडाखेबंद

चांगल्या संगे असे चांगला
करि कधी धरे शस्त्रही तो
येईल कधी जर अडवा कोणी
स्वहस्ते फेडे वस्त्र ही तो

आई:
आपल्यासारख्यांचे काम असे का
परीराणी जरा घे समजून
लग्नगाठी आयुष्य भरीच्या
घ्याव्या सुलाखून अन् तावून

काय अवदसा आठवे पोरीला
सडक छापा मध्ये फसली
सांग एकही सद्गुण मजला
कला त्या मध्ये असते कसली

परी:
बाणेदार हुशार अन् काय काय
सत्वगुणांचा असा वृक्ष तो
फुटते फांदी कधी तर त्याला
नाही लव्ह करण्यास रूक्ष तो

आई:
बाई बाई काहीही बोलशी
हाड जिभेला तुझ्या नसे
प्रिय अमुची आम्हा परिराणी
का तव ह्रदयी एक गुंड वसे?

परी:
गुंड नव्हे तो नसे रोमिओ
नाही बिलकुल सख्या हरी
काय करावी जादू त्याने
की ह्रदय देऊनी बसली परी

बाबा:
बोल काहीही तू आता तर
ऐकून नच घेईन मीही
तोडून तंगडे तुझे मी आता
डांबून ठेवीन तुजसी गृही
***
स्टेजवर अंधार. प्रकाश फक्त परीवर ..

परी:
घाला चष्मा नवा नि सुलटा
उलट्यातूनी का बघता तुम्ही
सर्वगुणसंपन्न असा एकमेव
का म्हणता त्याला कुचकामी?

पहा नजरेने माझ्या कृपया
असेल हरी सख्या म्हणता जर
समजून घ्यावे अन तुम्ही मजला
तो न उंदीर अन न मी मांजर
*****

स्थळ: रस्त्यावरील नाका
स्टेजवर परी आणि रोमिओ.
रोमिओ वर्णनात बसणारा ..

परी:
सडक छाप.. हरी सख्या..
कुणी म्हणो तुज काहीबाही

तूच माझिया हृदयी राजा
मी तुजला रे सोडत नाही

रोमिओ:
आयी आयी लाईन अपनी
वेल्कम वेल्कम मेरी रानी
आइकून तू बोलत गाना
तबियत खुश सुनके गानी

तू चल आती क्या खंडाला
बिन बारिश बरसे पानी
तूच एक जो समझे मेरेको
सच बोल्ती दिल की रानी

परी:
पाहून तुझ्या अस्तव्यस्त केसां
अडकले काळीज त्या गुंत्यात
कुणास काय जाते सांगाया
पाहिले म्हणती तुज गुत्त्यात

रोमिओ:
बोल्दे तू मैना मेरी
आपन इस्पीक एक्का पत्त्यात

परी:
तूच माझा हार्टथ्राॅब रे
माझ्या सोन्या, खरंय रे जानू

रोमिओ :
सुन मेरी आयटम छम्मक छल्लो
मैं भी दिल्काहीच कहना मानू

परी:
मालूम रे मुझको मी तुझीच राजा
पण समजावू दुनियेला मी कशी
घरी वाटते तू असला अन्
मी कसली पडलीय फशी

किती रे डॅशिंग असा रोमिओ
बघून तुजला गेले हरखून

ऐकताच नाव तुझेच का पण
आईचे जाई मस्तक सरकून

रोमिओ :
मेरेको भी मालूम सबकुच पन
मारतो आपन दुनियेला लाथ
आपनच बनाऊं कायदा दुनियाका
तूच देंगी ना मेरेको साथ

परी:
सांग जरासा जर असशी असला
का नाकारू तुजला मी तर
जाईन ओलांडून सात सागर ही
आयुष्य असले कितीही खडतर

राडेबाजी करण्या का ती
हिंमत कोणा कमी लागे
नाक्यावरती बसून शीळ फुंकण्या
किंमत का कधी कमी लागे

रोमिओ:
इस गल्ली से उस गल्लीतक
चलती है अपनीहीच वट
मालूम मेरेको लोक बोलती
छोड दे समझके वो वटवट

परी:
रोमिओ, रोमी, रोमू, रोमुल्या
रोम्या.. आले मी सोडून घरदार
तूच एक तो किती चांगला
दुष्ट दुष्ट असा कसा रे संसार

रोमिओ :
च्यायला आपनला न विचारता
आली सोडून तू घरदार?
इतकी कसली घाई तुला
रहेंगी किदर.. जरा तरी विचार ..

भेजाचे झाले वांधे ..
आई शपथ गँग चे होईल काय

त्यात तुला आपन ठेवू कुठं
आपनला तर समजत नाय

परी:
रहूं मैं दिल में तेरे ही
जानू, सोनू मेरा तू दिलवर
तू ताश का है राजा
और मैं रानी किलवर

तुजसाठी रे माझ्या सोन्या
छोड आऊंगी मैं जग सारा

रोमिओ:
सच है मेरी मधुबाला तू
तेरेलिए तोडूंगा मैं तारा

एक बात पण सुनना आपनकी
वापिस जा घर अब तू
आपन खुद आएगा हाथ मांगने
टेंन्शन मत लेना बिल्कुल तू

परी:
ओके तू म्हणतो तर
ठेवते तुझ्यावर विश्वास मी
पण समज रे जानू एकदातरी
तू नाक असशी अन् श्वास मी

तूच माझा श्वास नि:श्वास
हार्ट बीट पण असशी कधी
जाते जाते अन् वाट पाहाते
येशील राजा माझ्या तू कधी?

रोमिओ :
आपन के घर भी वैसाच स्टोरी
आई बोल्ते कोण करेल पत्कर?
आपनका वर्ड है आपन आएगा
जलदी आएंगा चिंता मत कर

बाय बाय मेरी दिल की रानी
पतली गलीसे जा तू निघ
नाक्यावरती होगा नवीन राडा
गँगवाल्यांची लागेल रीघ

मत कर खोटी टैम पर कामके
काममें वैसे बिझी हूं आपन

परी:
ओके सोन्या निघते मी तर
वाट पाहाते तुझीच मी पण

परी निघून जाते. रोमिओ एकटाच राहातो..
स्वगत:
ये खरी अस्मानकी परी
अच्छी थी वो छोरी उस्मानकी
पर ही वाली आहे फंडू यार
कली जैसे चमन में बहारकी..

दुनिया च्यायला नहीं सुनेगी
इसके घर में फेल मैं वरना
आयड्या है दिमागमें मेरेहीच
कुच तो पडेगा जरूर करना
***

स्थळ: परीचे घर

आई, बाबा, परी आणि रोमिओ सगळे आहेत. रोमिओ थोडा अंग चोरून असला तरी चेहऱ्यावर तीच मगरूरी आहे. फक्त अंगात एक स्वच्छ शर्ट आहे नि गळयात बांधलेला रूमालही नवीन आहे. परी त्याच्याकडे प्रेमभरल्या नजरेने पाहते आहे. आई हताश तर बाबा जमेल तितक्या आक्रमक भावाने बघताहेत.

आई:
कोण कसा तो आणलास पकडून
रोड रोमिओ हून दुसरा न दिसला?

बाबा:
काय मनात तुझ्या पोरी तू
दिवस दाखवीत आहे असला..

ऐकून घेईन बाजू तुझी मी
वळितो मग याची गचांडी

आई:
देवा दिवस दाखवितोस असला
बसेल हा का आपल्या बोकांडी

परी:

नका बोलू तुम्हीच काही
हे सारे बोलून झाले एकदा
उगाच उगळू नका परत ते
किटती कान ऐकूनी कैकदा

रोमिओ :

ऐ परी, बुलाई तू मेरेको ऐसा सुनाने
आपन की भी है कुच पोझिशन
करेंगा राडा इदरीच नै तो
दिखा देंगा आपनका सोल्यूशन

आपन साला एक नंबरी
दुनिया बोल्ती क्यू दस
आपन को नै सुनने का
निकलूं क्या मैं बस..

परी:

आई, बाबा ऐकून तर घ्याना
होतकरू मुलगा किती

पटेल किंवा नाही पटेल तरी
नाही मजला क्षिती

आधीच गायिले याचे गुणगान
अजून वर्णू किती
राडेबाजी, गुंडागर्दी, पाकिटमारी
याच्या कर्तृत्वाच्या मिती

रोमिओ:
नहीं परी मत बोलो ऐसे
गुणगानसे आती शरम
विनयानेच शोभे विद्या
हाच आपनका धरम

बोले तो..
आदमी बनता बडा कामसे
नाही इंम्पॉरटंड उसका नाम..

बाबा: (मध्येच वाक्य तोडीत)
वा! वा! किती विचार ते
उदात्त असती फार

नाक कापशील बापाचे
मिळती न खांदे देण्या कुणी चार

आई:
अभद्र बोलू नका असले
पण जाईल लाज आपली खरे
कार्टे सांग एका शब्दाने का
संमती आम्ही द्यावी बरे?

कोण कुठला काय करतो
शेण घालेल ती भावकी
भविष्य याचे असेल कसले
सर्वांनाच ठाऊकी

रोमिओ :
मम्मी मम्मी मत बोलो ऐसे
बताऊं किसको कुच कैसे
होनहार मैं जवान बच्चा
मेहनत मैं करूंगा ऐसे

करते दिमाग का दही सारे
बोलूं बनाओ छास
आज गली का दादा मैं तो
और बडा बननेकी है आस

परी:
किती उच्च रे विचार तुझे
आज वट तुझीच गल्लीत
होशील जरूर मोठा कुणी तू
जाशील उद्या तू दिल्लीत

रोमिओ :
क्या बोलती तू..
मुंह में घी और शक्कर
बडा बनूंगा जरूर मैं भी
लगाके पॉलिटिकल चक्कर

आज नहीं मै बडा कोईपण
कल नगरसेवक बन जाऊं
और बोले ते बनते बनते
परसो आमदार मैं बन जाऊं

मेरा कामच ऐसा है कुच
फिर बन जाऊं मंत्री संत्री

बाबा :
परी हे तर नव्हते आले ध्यानी
ही तर याच्या कामाची जंत्री

किती सुलक्षणी मुलगा हा तर
फ्युचर आहे याचे ब्राईट
आमदार कुणी असे जावई
सांगता आपलीही कॉलर टाईट

आई:
काय असे हो असे हरखता
असे कसे बोलता तुम्ही

बाबा:
ठाऊक नाही तुला ग बाई
मुलगा किती हा नामी

कामाला असे वाघ तो
सध्या असेल कार्यस्थल गल्ली
कर्तृत्वाची शान अशी तर
दूर असे का त्याला दिल्ली?

आई:
मी म्हणते काय ते तर ऐका..

बाबा :
नाही समजत जनरीत तुला गं
नवी न आहे समाज रीत अन्
उज्वल आहे भविष्य गं

परी लाडकी आपुली राणी
नामदार पत्नी वा कुणी मंत्री
लवकर टाकू उरकून सारे
वाजतील आता वाजंत्री

परी:
पापा ओ पापा.. किती छान तुम्ही
ऐकलीत माझ्या हृदयीची हाक

रोमिओ :
तू माझीच हार्टथ्रॉब अन्
बोले तो मैं भी हुवा अवाक्

बाबा:
नांदा सौख्य भरे बाळांनो
तू पण दे ग यांना आशीर्वाद

आई:
म्हणता तुम्ही तर देते बाई
घालत नाही अजूनी वाद

रोमिओ आणि परी पाया पडतात. दोघे आशीर्वाद देतात .. थोडावेळ अंधार .. शांतता. हळूहळू उजेड पसरतो.. फक्त रोमिओ आणि पाठी उभ्या परी आणि तिच्या आई बाबांवर. रोमिओ पाठमोरा जातो.. समोर गर्दीचा गोंगाट. मग आवाज.. घोषणा ऐकू यायला लागतात ..
येऊन येऊन येणार कोण.. रोमिओ शिवाय आहेच कोण?
देश का नेता कैसा हो.. रोमिओ भाई जैसा हो

रोमिओ भाई आगे बढो.. हम तुम्हारे साथ हैं
एक दो तीन चार.. रोमिओका जयजयकार

परी प्रेमाने पाहात राहाते..
तर आई बाबा कौतुकाने ..
रोमिओ बाहेर जाता जाता वर हात करून समोर जनता असल्यासारखा डोक्यावर हात जोडून नमस्कार करतो..
पाठून आवाज:


राजकुमार रोमिओ तो
परिकथेतून थेट उतरला
भविष्य उज्वल त्याचे आणिक
अंतरीस त्या नाना कला

रोमिओ धन्य धन्य ती परी
अशी ही रोमिओ परीची परीकथा
श्रोते हो धन्य धन्य ते कर्ण
परिसती रम्य अशी परी कथा


त्या आवाजातच हळू हळू पडदा पडतो.

डॉ. नितीन मोरे यांची ३३+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





































डॉ. नितीन मोरे




राजा दरबारी

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक


अंजनईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


सुलट
२७६
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..


Jackson!

## **ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष**
## **डॉ. नितीन मोरे यांचे हे चौतिसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा

नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र

ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे, अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं “इ”यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।